बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर

### माहिती कक्ष, दि २० जानेवारी २०२४

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १९/२०२४ भादवि ३८० प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १९/०१/२०२४ रोजी २३.०० वा ते दि. २०/०१/२०२४ रोजी सकाळी ०७.०० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २०/०१/२०२४ रोजी १६.१९ वा |
| **फिर्यादीचे नाव** | : | प्रभाकर उमेश घंटे, वय- ३३ वर्षे, रा. घर नं. ५९, मुकुंद नगर, भवानी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १) १,०००/- रु पांढऱ्या रंगाची जिन्स पॅन्ट, त्यात खिशात असलेले पॉकेट मधील रोख रक्कम<br>२) २०,०००/- रु अर्धा तोळे वजनाच्या दोन पिळयाच्या सोन्याचे अंगठया<br>३) ६,०००/- रु ३ ग्रॅम वजनाचे सोन्याची कर्णफुले<br>४) १५,०००/- रु रोख रक्कम<br>एकुण- ४२,०००/- रुपये असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या घराचे पाठीमागील बाजुस असलेल्या बाथरुमच्या दरवाज्यातुन पाठीमागील घराच्या विसरुन उघडे राहिलेल्या दरवाज्यातुन आत प्रवेश करुन, फिर्यादीचे घरातील वरील वर्णनाचे व किंमतीचे ऐवज व रोख रक्कम फिर्यादीच्या संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरुन नेला आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १०७६ पवार - ९०२२५८३३५३ |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३१/२०२४ भादवि ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २६/०४/२०१९ रोजी लग्नानंतर सुमारे १० दिवसांनी ते दि. ०६/१०/२०२३ रोजी पर्यंत वेळोवेळी, फिर्यादीचे सासरी |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २०/०१/२०२४ रोजी १४.४१ वा |
| **फिर्यादीचे नाव** | : | सौ. अंबिका किरण दगडे, वय- ३२ वर्षे, रा. घर नं. ७५६, दक्षिण कसबा, काळी मशिदीसमोर, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) किरण राजेंद्र दगडे- पती, २) राजेंद्र रामदास दगडे- सासरे, ३) नंदा राजेंद्र दगडे- सासु, ४) शितल दिपक शिंदे- नणंद, सर्व रा. मातोश्री निवास, गांधी चौक, जोग महाराज नगर, ता. ईगतपुरी, जि. नाशिक |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे लग्नानंतर सुमारे १० दिवसांनी ते दि. ०६/१०/२०२३ रोजी पर्यंत यातील वरील आरोपीतांनी फिर्यादीस तु इंजिनिअर आहेस, नोकरी करुन पैसे कमवशील या उद्देशाने तुला लग्न करुन आणले आहे, तुझे तु नोकरी कर आणि पैसे कमव, आम्ही तुझा खर्च करणार नाही जावई यांचा चांगला मानपान केला नाही, सणासुदीला जावई करीता सोन्याची अंगठी घालावयाचे पध्दत आहे की नाही आणि दुबई ला जायचे आहे त्याकरीता कपडे लागणार आहेत. पोटातील मुल खाली कर नाहीतर सोडुन दे, मुल झाल्यानंतर सोडणी कठीण होईल, फिर्यादी ही बी |

| | | |
|---|---|---|
| | | ई इंजिनीअर असुन पैसे कमवशील म्हणून फिर्यादीस पसंत केले, आधी नोकरी करेल म्हणून आरोपीताने लग्न करुन घेतले आहे. व तसेच फिर्यादीचे प्रसुतीचे खर्च आरोपीतांना करावा लागलेला आहे. तो प्रसुतीचा खर्च तुझ्या आईकडुन मागुन घे. फिर्यादीचे पती आरोपीत क्रं. १ याचे विवाहबाह्य संबंध असल्याचे संशय आल्याने विचारणा केली असता वरील आरोपीतांनी फिर्यादीस मारहाण शिवीगाळ दमदाटी करुन मानसिक व शारिरीक त्रास देऊन जाचहाट छळ केला आहे. फिर्यादीची वरील आरोपीतांविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. तपासः- पोहेकॉ- १००५ मुजावर- ७०२०४३७०३४ |